**L. A. BILL No. XXXVII OF 2023.**

A BILL

FURTHER TO AMEND THE BOMBAY CITY CIVIL COURT ACT, 1948.

## सन २०२३ चे विधानसभा विधेयक क्रमांक ३७.

### मुंबई शहर दिवाणी न्यायालय अधिनियम, १९४८ यात आणखी सुधारणा करण्याकरिता विधेयक.

१९४८ चा मुंबई ४०.

**ज्याअर्थी,** यात यापुढे दिलेल्या प्रयोजनांसाठी, मुंबई शहर दिवाणी न्यायालय अधिनियम, १९४८ यात आणखी सुधारणा करणे इष्ट आहे; **त्याअर्थी,** भारतीय गणराज्याच्या चौऱ्याहत्तराव्या वर्षी, याद्वारे, पुढील अधिनियम करण्यात येत आहे :—

संक्षिप्त नाव.

**१.** (१) या अधिनियमास, मुंबई शहर दिवाणी न्यायालय (सुधारणा) अधिनियम, २०२३, असे म्हणावे.

(२) तो, राज्य शासन, **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे नियत करील अशा दिनांकास अंमलात येईल.

सन १९४८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ४० याच्या कलम ३ ची सुधारणा.

**२.** मुंबई शहर दिवाणी न्यायालय अधिनियम, १९४८ (यात यापुढे, ज्याचा निर्देश " मुख्य अधिनियम " असा केला आहे) याच्या कलम ३ मधील,— (१९४८ चा मुंबई ४०.)

(एक) " एक कोटी रुपयांहून अधिक नसतील अशा मूल्याचे " या मजकुराऐवजी, " दहा कोटी रुपयांहून अधिक नसतील अशा मूल्याचे " हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(दोन) परंतुक वगळण्यात येईल.

सन १९४८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ४० याच्या कलम ४अ ची सुधारणा.

**३.** मुख्य अधिनियमाच्या कलम ४अ मध्ये, पोट-कलम (१) मधील, " मुंबई शहर दिवाणी न्यायालय (सुधारणा) अधिनियम, २०१२ याचे कलम ४ " या मजकुराऐवजी, " मुंबई शहर दिवाणी न्यायालय (सुधारणा) अधिनियम, २०२३ याचे कलम २ " हा मजकूर दाखल करण्यात येईल. (२०१२ चा महा. २५. २०२३ चा महा. .)

अडचणी दूर करण्याचा अधिकार.

**४.** (१) या अधिनियमाद्वारे सुधारणा केल्याप्रमाणे, मुंबई शहर दिवाणी न्यायालय अधिनियम, १९४८, अधिनियमाच्या तरतुदी अंमलात आणताना, कोणतीही अडचण उद्भवल्यास, राज्य शासनास, प्रसंगानुरुप उद्भवेल त्याप्रमाणे, ती अडचण दूर करण्याच्या प्रयोजनासाठी, त्यास आवश्यक किंवा इष्ट असल्याचे दिसून येईल अशी, या अधिनियमाद्वारे सुधारणा केलेल्या मुंबई शहर दिवाणी न्यायालय अधिनियम, १९४८, अधिनियमाच्या तरतुदींशी विसंगत नसलेली कोणतीही गोष्ट, **शासकीय राजपत्रात** प्रसिद्ध केलेल्या आदेशाद्वारे करता येईल :

परंतु, या अधिनियमाच्या प्रारंभाच्या दिनांकापासून दोन वर्षांचा कालावधी समाप्त झाल्यानंतर, असा कोणताही आदेश, काढण्यात येणार नाही.

(२) पोट-कलम (१) अन्वये काढलेला प्रत्येक आदेश, तो काढण्यात आल्यानंतर, शक्य तितक्या लवकर, राज्य विधानमंडळाच्या प्रत्येक सभागृहासमोर मांडण्यात येईल.

## उद्देश व कारणे यांचे निवेदन.

मुंबई शहर दिवाणी न्यायालय अधिनियम, १९४८ (१९४८ चा मुंबई ४०) याच्या कलम ३ मध्ये नमूद केल्याप्रमाणे, उच्च न्यायालयाद्वारे व लघुवाद न्यायालयाद्वारे दखल घेण्यायोग्य असलेले दावे व कार्यवाह्या यांखेरीज, बृहन्मुंबईमध्ये उद्भवणारे, दिवाणी स्वरूपाचे सर्व दावे व कार्यवाह्या दाखल करून घेण्याची, त्यांची न्यायचौकशी करण्याची व ते निकालात काढण्याची अधिकारिता असणारे, अतिरिक्त शहर दिवाणी न्यायालय बृहन्मुंबई क्षेत्राकरिता स्थापन करण्यासाठी उक्त अधिनियम अधिनियमित करण्यात आला होता. बृहन्मुंबई शहराच्या मूळ अधिकारितेचे प्रधान दिवाणी न्यायालय म्हणून असलेल्या मुंबई उच्च न्यायालयाचा भार कमी करण्याच्या दृष्टीने, उक्त कायदा अधिनियमित करण्यात आला होता, जेणेकरून, विवक्षित दिवाणी प्रकरणाच्या बाबतीतील उच्च न्यायालयाची अधिकारिता, शहर दिवाणी न्यायालयाला प्रदान करता येईल.

२. दिवाणी स्वरूपाचे सर्व दावे व इतर कार्यवाह्या दाखल करून घेण्याची, त्यांची न्यायचौकशी करण्याची व ते निकालात काढण्याची मुंबई शहर दिवाणी न्यायालयाची द्रव्यविषयक अधिकारिता, २०१२ पासून एक कोटी रुपयांपेक्षा अधिक मूल्याची नाही. दहा वर्षांपेक्षा अधिक कालावधीत, मुंबईतील मालमत्तांचे मूल्य झपाट्याने वाढले आहे. मालमत्तांच्या मूल्यात झपाट्याने वाढ झाल्यामुळे, मुंबईतील मालमत्तांशी संबंधित असलेल्या दिवाणी दाव्यांचे मूल्यांकनदेखील वाढलेले असून, त्याचा परिणाम, मुंबई शहर दिवाणी न्यायालयाऐवजी, मुंबई उच्च न्यायालयात अधिक संख्येने दावे दाखल होण्यात झाला आहे. मुंबई उच्च न्यायालयाच्या कामाचा भार कमी करण्यासाठी, मुंबई शहर दिवाणी न्यायालयाच्या द्रव्यविषयक अधिकारितेत, दहा कोटी रुपयांपर्यंत वाढ करणे आवश्यक आहे. प्रस्तावित सुधारणेच्या परिणामी, मुंबई उच्च न्यायालयासमोर प्रलंबित असलेले ८६७२ दिवाणी दावे, मुंबई शहर दिवाणी न्यायालयाकडे हस्तांतरित केले जातील, त्यामुळे हे दावे, जलद गतीने निकालात काढण्यास मदत होईल. ते पक्षकारांच्या सोयीचे देखील होईल. म्हणून, मुंबई शहर दिवाणी न्यायालय अधिनियम, १९४८ याच्या कलम ३ मध्ये सुयोग्य सुधारणा करणे इष्ट आहे असे वाटते.

३. वरील उद्दिष्टे साध्य करणे हा, या विधेयकाचा हेतू आहे.

मुंबई,
दिनांक २७ जुलै, २०२३.

**देवेंद्र फडणवीस,**
उप मुख्यमंत्री.

## वैधानिक अधिकार सोपविण्यासंबंधीचे ज्ञापन.

या विधेयकामध्ये वैधानिक अधिकार सोपविण्यासंबंधीचे पुढील प्रस्ताव अंतर्भूत आहेत :—

**खंड १ (२).—** या खंडान्वये, राज्य शासन **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे, नियत करील अशा दिनांकास हा अधिनियम अंमलात आणण्याचा अधिकार, राज्य शासनाकडे घेण्यात आला आहे.

**खंड ४.—** या अधिनियमाद्वारे सुधारणा केलेल्या, उक्त अधिनियमाच्या तरतुदी अंमलात आणताना कोणतीही अडचण उद्‌भवल्यास या अधिनियमाच्या प्रारंभाच्या दिनांकापासून दोन वर्षांच्या कालावधीच्या आत, अशी कोणतीही अडचण, **शासकीय राजपत्रात** प्रसिद्ध केलेल्या आदेशाद्वारे, दूर करण्याचा अधिकार, राज्य शासनाकडे घेण्यात आला आहे.

२. वैधानिक अधिकार सोपविण्यासंबंधीचे वर नमूद केलेले प्रस्ताव, सामान्य स्वरूपाचे आहेत.

## सन २०२३ चे वि.स. विधेयक क्रमांक ३७.—मुंबई शहर दिवाणी न्यायालय (सुधारणा) विधेयक, २०२३.

### (मुंबई शहर दिवाणी न्यायालय अधिनियम, १९४८ मधील उतारे.)

### (सन १९४८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४०.)

**१.** व **२.** ** ** **

**३.** राज्य शासनास **राजपत्रात** प्रसिद्ध केलेल्या अधिसूचनेद्वारे, बृहन्मुंबईसाठी मुंबई शहर दिवाणी न्यायालय या नावाचे एक न्यायालय स्थापन करता येईल. कोणत्याही कायद्यात, काहीही अंतर्भूत असले तरी, अशा न्यायालयास [एक कोटी रुपयांहून अधिक नसतील अशा मूल्याचे] बृहन्मुंबईत उद्‌भवणारे दिवाणी स्वरूपाचे सर्व दावे व इतर कार्यवाही स्वीकारण्याची, त्यांची न्यायचौकशी करण्याची व ते निकालात काढण्याची अधिकारिता असेलः शहर न्यायालयाची रचना.

परंतु, (अ) ॲडमिरॅलिटी न्यायालय किंवा व्हाईस ॲडमिरॅलिटी न्यायालय म्हणून किंवा कलोनियल ॲडमिरॅलिटी न्यायालय म्हणून किंवा मृत्यूपत्रविषयक, अकृतमृत्यूपत्राविषयक किंवा विवाहविषयक अधिकारिता असलेले न्यायालय म्हणून उच्च न्यायालयास, किंवा

(ब) नादार ऋणकोंच्या ऋणनिवारणासाठी उच्च न्यायालयास, किंवा

(क) लेटर्स पेटंटव्यतिरिक्त इतर कोणत्याही विशेष कायद्यान्वये उच्च न्यायालयास, किंवा

(क-१) पारसी विवाह व घटस्फोट अधिनियम, १९३६ अन्वये उच्च न्यायालयास किंवा

(क-२) बौद्धिक मालमत्ताविषयक बाबीसंदर्भात उच्च न्यायालयास; किंवा

(ड) लघुवाद न्यायालयास,

परंतु, राज्य शासनास, वेळोवेळी, उच्च न्यायालयाशी विचारविनिमय करून, **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे, शहर न्यायालयाच्या द्रव्यविषयक अधिकारितेत वाढ करता येईल. आणि उच्च न्यायालयाच्या द्रव्यविषयक अधिकारितेत तद्नुरूप फेरफार करता येईल.

**४.** ** ** **

**[४अ.** [३][(१) मुंबई शहर दिवाणी न्यायालय व मुंबई लघुवाद न्यायालय (द्रव्यविषयक अधिकारिता वाढविणे व सुधारणा) अधिनियम, १९८६ याच्या कलम ९ मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, कलम ३ च्या खंड (अ) ते (ड) खाली येणारे दावे किंवा प्रकरणे वगळता कलम ३ अन्वये शहर न्यायालयाने दखल घेण्याजोगे असलेले आणि मुंबई शहर दिवाणी न्यायालय (सुधारणा) अधिनियम, २०१२ याचे कलम ४ अंमलात येण्याच्या दिनांकास उच्च न्यायालयात प्रलंबित असलेले सर्व दावे व प्रकरणे, शहर न्यायालयाकडे वर्ग होतील. [४][कलम ३ अन्वये दखल घेण्याजोगे असलेले दावे व प्रकरणे शहर न्यायालयाकडे वर्ग करणे.]

(२) व (३) ** ** **

**४ब.** ** ** **

**५.** व **१८.** ** ** **

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**

**[ सन २०२३ चे विधानसभा विधेयक क्रमांक ३७. ]**

**[ मुंबई शहर दिवाणी न्यायालय अधिनियम, १९४८ यात आणखी सुधारणा करण्याकरिता विधेयक.]**

[**श्री. देवेंद्र फडणवीस,**
उप मुख्यमंत्री.]

**जितेंद्र भोळे,**
सचिव (१) (कार्यभार),
महाराष्ट्र विधानसभा.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई